# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**शुक्रवार, दिनांक २४ मे, २०१९/ज्येष्ठ ३ शके, १९४१**

**शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील कक्षबंधांचे आरक्षण**

४७. महाराष्ट्र विधानसभेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, दिनांक २४ मे, २०१९ ते दिनांक १५ जून, २०१९ या कालावधीकरिता शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील १० कक्षबंध महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. या सचिवालयाकडे उपलब्ध असलेले कक्षबंध, आरक्षणाचा कालावधी तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्या व सदस्यांची संख्या लक्षात घेता एका सदस्यासाठी उक्त कालावधीत एका विशेष कक्षाचे आरक्षण उपलब्धतेनुसार व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर फक्त तीन दिवसांसाठी करण्यात येईल.

ज्या सन्मा.सदस्यांना उक्त कालावधीत **कक्षबंधांचे आरक्षण हवे असेल त्यांनी संसदीय आयुधांकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला त्यांचा लॉगईन आयडी वापरुन संगणक प्रणालीवर संपूर्णत: Online पद्धतीने, ज्या दिवसाकरिता आरक्षण हवे असेल त्याच्या कमीत कमी तीन दिवस अगोदर आरक्षण करावे** अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. केवळ ऑनलाईन आरक्षण करता येईल, पत्राद्वारे किंवा ऑफलाईन पद्धतीने आरक्षणाची सुविधा उपलब्ध असणार नाही.

विधानमंडळ सचिवालयाकडे सुपूर्द करण्यात आलेले कक्ष विधानमंडळ सदस्य व विधानमंडळ समित्यांवरील सदस्यांसाठी राखीव असल्याने विधानमंडळ समित्यांच्या बैठका महाबळेश्वर येथे घ्यावयाचे ठरविल्यास संबंधित समिती सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांसाठी आरक्षित केलेल्या कक्षबंधाचे आरक्षण रद्द करण्याचे अधिकार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने राखून ठेवले आहेत.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ मे, २०१९

**जितेंद्र भोळे**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभा सर्व सन्मा.सदस्य
२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
६) संगणक कक्ष (Website)